# आता 'स्टे सेफ'

पुणे, ता. ११ : तुम्ही अडचणीत असल्याची माहिती एका संदेशाद्वारे इतरांना कळविणारे 'स्टे सेफ' नावाचे नवे ॲप्लिकेशन बाजारात आले आहे.

स्मार्टफोन आणि आयफोनसाठी हे ॲप्लिकेशन असले, तरी संदेश कोणत्याही मोबाईलवर जाणार आहे. 'एक्स्टेन्शिया' सॉफ्टवेअर कंपनीने हे ॲप विकसित केले आहे. रात्रीचा प्रवास, घरात एकटे असताना काही अडचण आल्यास मोबाईल हलविला, की आपण असलेले ठिकाण, आपल्याबरोबर काय होत आहे, याची माहिती मेसेज आणि ई-मेलद्वारे नोंदविलेल्या क्रमांकांना जाईल.